केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आयुष्मान भारत आरोग्य पायाभूतसुविधा अभियानाकरिता सन २०२६-२७ मधील मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीमधून आदिवासी उपयोजनेकरीता अनुदान राज्य आरोग्य सोसायटीस वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन शुध्दीपत्रक क्रमांकः बियुडी -१३२६/प्र.क्र.२०९/एनएचएम सं.क्र.१६६०९०४

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : २४ जून, २०२६

वाचा :-

१) शासन निर्णय समक्रमांक दिनांक २१/०५/२०२६
२) संचालक (वित्त व लेखा) यांच्या प्रस्ताव क्र.राआसोम/एफएमजी/३६६००/२६-२७,दि. २२/०६/२६

शासन शुध्दीपत्रक :-

प्रधानमंत्री आयुष्मान भारत आरोग्य पायाभूतसुविधा अभियाना करीता सन २०२६-२७ मधील अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकातील तरतूदी नुसार आदिवासी उपयोजनेकरीता केंद्र हिस्सा लेखाशिर्ष २२१०H४८१ बाब-३१ अंतर्गत (सहायक अनुदाने वेतनेत्तर) रु.८३.२३ लक्ष व बाब-३५ अंतर्गत (भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान) रु.८११.२३ लक्ष तसेच त्यास समरुप राज्य हिस्सा लेखाशिर्ष २२१०H४९२ बाब-३१ अंतर्गत (सहायक अनुदाने वेतनेत्तर) रु.५५.४९ लक्ष व बाब-३५ अंतर्गत (भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान) रु.५४०.८२ लक्ष इतके अनुदान राज्य आरोग्य सोसायटीस तातडीने वितरीत करण्याचा शासन निर्णय दि.२१/०५/२०२६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयामध्ये पृष्ठ क्र. ३ मधील परिच्छेद क्रमांक ५, ६ व ७ मध्ये खालील विवरणपत्रातील स्तंभ ३ मध्ये नमुद केल्यानुसार सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

परिच्छेद क्र.	शासन निर्णय दि.२१/०५/२०२६ मधील तपशील	सुधारणा
१	२	३
५	यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखापरीक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप घेतलेले नाहीत राज्य आरोग्य सोसायटीने प्रमाणित केलेले आहे.	यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखापरीक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप घेतलेले नाहीत.
६	सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी पुरवठादाराच्या खात्यात	सन २०२३ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ अंतर्गत दिनांक १७-०३-२०२३ रोजी

	थेट जमा होणार आहे.	प्रसिद्ध केलेल्या अधिनियमास अनुसरून योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यात आरोग्य संबंधित औषधे वस्तू आणि साहित्य हे महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू व सेवा खरेदी प्राधिकरणामार्फत खरेदी करण्यात येतील.
७	सदर प्रस्तावत वस्तू खरेदी प्रस्ताव तसेच, भांडवली वस्तू खरेदीचा समावेश नाही. सदर कार्यक्रमाच्या संबंधित लेखाशीर्षाखाली एक वर्ष जूने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. शासनाच्या धोरणानुसार सदर प्रस्तावावरील निधी राज्य आरोग्य सोसायटीच्या स्वतंत्र बॅक खात्यात जमा करुन खर्च करण्यात येत असल्याचे त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या दिनांक ०९.०४.२०२६ च्या शासन परिपत्रकातील संबंधित असलेल्या सर्व तरतुदीचे/अटी व शर्तीचे पालन करुन त्यासंदर्भात आवश्यक ते प्रमाणपत्र सादर करणे अथवा आवश्यक त्या बाबी स्वतंत्रपणे प्रमाणित करणे राज्य आरोग्य सोसायटीस सदरहू निधी ज्या यंत्रणेमार्फत खर्च करण्यात येणार त्या कार्यक्रम प्रमुखास बंधनकारक राहील.	सदर कार्यक्रमाच्या संबंधित लेखाशीर्ष खाली एक वर्ष जूने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. शासनाच्या धोरणानुसार सदर प्रस्तावावरील निधी राज्य आरोग्य सोसायटीच्या भारतीय रिझर्व्ह बँक खात्यात जमा होऊन खर्च करण्यात येतो. त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या दिनांक ०९.०४.२०२६ च्या शासन परिपत्रकातील संबंधित असलेल्या सर्व तरतुदीचे/अटी व शर्तीचे पालन करुन त्यासंदर्भात आवश्यक ते प्रमाणपत्र सादर करणे अथवा आवश्यक त्या बाबी स्वतंत्रपणे प्रमाणित करणे तसेच सदरहू निधी राज्य आरोग्य सोसायटी किंवा ज्या यंत्रणेमार्फत खर्च करण्यात येणार त्या कार्यक्रम प्रमुखास बंधनकारक राहील.

०२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र.२०२६०६२४११४४५४०७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIL VITHALRAO SAWARE

Digitally signed by ANIL VITHALRAO SAWARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=073348B7A8767F0F7865422DF1E65CE2F3BCDF6786E4712E2C088A9AC4FFEE3F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1C7875BFBCCDB94828A5028954F06ED28EC75FD43053DB3AE8254FA5A5D14A57, cn=ANIL VITHALRAO SAWARE
Date: 2026.06.24 15:38:47 +05'30'

(अनिल वि. सावरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.

२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४. संचालक (रुग्णालये), आरोग्य सेवा, आयुक्तालय, मुंबई.
५. संचालक (प्राथमिक), आरोग्य सेवा, पुणे.
६. संचालक, (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
७. अति. संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पूणे
८. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११.वित्त विभाग (अर्थसंकल्प/व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
१२.अवर सचिव, (अर्थसंकल्प व लेखा), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.निवडनस्ती (एनएचएम) .